# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.06.2024** **वार – मंगळवार**

---

**पदभार**

केंद्र सरकारमधील नव्या मंत्र्यांनी आज आपापल्या मंत्रीपदाचा पदभार स्वीकारला आणि कामकाजाला सुरुवात केली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह आणि सहकार राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही अन्य मंत्र्यांबरोबर पदभार स्वीकारला. दरम्यान, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली 'सहकार मंत्रालय' विकसित भारताचा संकल्प साकारण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल' असा विश्वास केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केला.

**साने गुरूजी**

ज्येष्ठ लेखक आणि विचारवंत साने गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज पुणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहातील साने गुरुजी यांच्या छायाचित्राला महानगरपालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

**महावितरण**

राज्य सरकार आणि महावितरण यांच्या वतीने स्मार्ट विद्युत मीटर लावणं सक्तीचं केलं जात आहे. नागरिकांकडून या मीटरला विरोध होत असूनही, ही मीटर सक्ती होत आहे. महाविरतणच्या या स्मार्ट मीटर धोरणाला आम आदमी पार्टीचा विरोध असल्याची माहिती आपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके पाटील आणि उपाध्यक्ष विजय कुंभार यांनी दिली.

**कार्यशाळा**

राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांना कर्जपुरवठा होण्यासाठी तसंच समुदाय आधारित संस्था-सीबीओ आणि बँका यांच्यातील सुसंवाद वाढविण्यासाठी; पुण्यात प्रमुख वित्तीय संस्थांच्या कार्यशाळेचं आयोजन नुकतंच करण्यात आलं होतं. या एक दिवसीय कार्यशाळेत विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी बँकांनी, स्मार्ट प्रकल्पातील समुदाय आधारित संस्थांना कर्ज मंजूरी देण्याकरता सकारात्मकता दर्शविली.

**बीबियाणे**

'यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना बी-बियाणे आणि रासायनिक खते निश्चित करून दिलेल्या दरानुसारच उपलब्ध करून द्यावीत. बियाणांची आणि रासायनिक खतांची जाणीवपूर्वक कृत्रिम टंचाई निर्माण

करणाऱ्या तसंच शेतकऱ्यांना जास्त दराने बियाणे आणि खतांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर वेळ पडल्यास फौजदारी खटले भरावेत'; असा इशारा राज्याच्या कृषी विभागाने दिला आहे. सध्याची बियाणांची एकूण मागणी ही 18 लाख क्विंटल इतकी आहे. मात्र क्षेत्रात वाढ झाल्यामुळे राज्याच्या कृषी विभागाने यंदा 24 लाख क्विंटल बियाणे मंजूर केलं आहे.

**मान्सून**

मोसमी पावसाच्या काळात रात्रीच्या वेळी कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं क्षेत्रीय कार्यालय निहाय; रात्रपाळी आपत्ती व्यवस्थापन पथक तैनात केलं आहे. अतिवृष्टी झाल्यास नदी किनाऱ्यावरील घरांमध्ये पाणी शिरण्याची शक्यता असते, तसंच जास्त पावसामुळे पाणी तुंबणे, पाणी घरात शिरणे, घरांची पडझड, झाडे पडणे अशा दुर्घटना टाळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून नियोजन केलं जात असल्याची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

**नालेसफाई**

शनिवारी पुणे शहरात दोनच तासांत झालेल्या पावसामुळे शहरातील अनेक रस्त्यांना नदी, नाल्याचं स्वरूप प्राप्त झालं होतं. पावसाचं पाणी वाहून जाण्यासाठी तयार केलेल्या भूमिगत गटारांमधून अनधिकृतरित्या केबल टाकण्यात आल्याचं उघड झालं. महापालिकेने भूमिगत गटारांचं सर्वेक्षण केल्यानंतर मोठ्या प्रमाणावर अशा केबल टाकण्यात आल्याचं आढळून आलं. या केबल टाकणाऱ्यांविरुद्ध आता पोलीस कारवाई केली जाणार आहे.

या पावसात पर्वती मतदारसंघातील विविध भागांमध्ये पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली; घरांमध्ये आणि दुकानांमध्ये पाणी शिरलं, आणि नागरिकांना वाहतूक कोंडीत अडकावं लागलं. या परिस्थितीला पुणे महानगरपालिका प्रशासन जबाबदार असून, प्रशासनाने नालेसफाई केल्याचा दावा फोल असल्याचा आरोप आमदार माधुरी मिसाळ यांनी केला आहे. पर्वती भागातील नालेसफाईच्या कामाचा आढावा घ्यावा आणि उद्याच कृती आराखडा तयार करून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी अशी मागणी मिसाळ यांनी आज आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडे केली.

**क्रीडा**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने आयोजित 'सीएसआर करंडक' या 13 वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब टी-20 क्रिकेट स्पर्धेत, एसए आर के क्रिकेट ॲकॅडमीने विजेतेपद मिळवलं. अंतिम सामन्यात एसए आर के क्रिकेट ॲकॅडमीने स्पेशलाईज्ड क्रिकेट ॲकॅडमीचा 6 गडी राखून पराभव केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज ढगाळ हवामान आहे. उद्याही आकाश अंशत: ढगाळ राहून हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी 6 वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**